# तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजी नगर, बहिरट पाटील चौक, पुणे ४११ ०१६

दूरध्वनी क्र.(०२०) २५६५६२३४ E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in


जा.क्र . विकापु/लले/गोप/वागोअ/२०१९-२०/ 970 दिनांक :- 25 FEB 2020

## परिपत्रक

विषय : गट अ व गट ब (राजपत्रित) संवर्गातील शासकीय अधिका-यांचे कार्यमूल्यमापन अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पध्दतीने लिहिण्याबाबत

संदर्भ : सहसंचालक, तं.शि.म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक १(२) /तंशिसं/कार्य.अह./२०१९-२०/३० दिनांक : १८.२.२०२०

असे निदर्शनास आले आहे की, आपल्या संस्थेतील काही अध्यापकांचे ई-मेल आयडी हे शासनाच्या दिनांक १५.१२.२०१७ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांनुसार @nic.in किंवा @gov.in वर तयार न करता @gmail.com चे आयडी सादर करण्यात आलेले आहेत. तसेच विभागाचे नाव लिहिताना तंत्रशिक्षण विभाग असे न दर्शविता संबंधित संस्थेचे नाव दर्शविण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील ज्या अध्यापकांचे ई-मेल आयडी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नसतील त्यांचे बाबतीत दिनांक १५.१२.२०१७ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांनुसार@nic.in किंवा @gov.in वर ई-मेल वर आयडी काढण्याबाबतची कार्यवाही करावी. तसेच विभागाचे नाव तंत्रशिक्षण विभाग ऐवजी संस्थेचे नाव लिहिलेले असल्यास त्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करुन सर्व अध्यापकांची बिनचूक माहिती (दिनांक ३१.१.२०२० रोजी आस्थापनेवर कार्यरत असलेले सर्व अध्यापक ) पुनःश्च अद्ययावत करुन तात्काळ सादर करण्यात यावी.

( डॉ. दिलीप नंदनवार )
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :

१. सर्व शासकीय संस्थाप्रमुख, पुणे विभाग
२. श्री. जी.सी.भिलावे, प्रोग्रॅमर, संगणक विभाग, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे यांना तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी